सेठ केसरीमल पोरवाल कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय, कामठी, नागपूर

# विभाग – मराठी

## अभ्यासक्रमाची रूपरेखा (Couse outcomes)

अभ्यासक्रमाचे नांव – **बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी.**

### ध्येय आणि उद्दिष्ट

हा पदवी अभ्यासक्रम असून हया अभ्यासक्रमात आजच्या काळाला लागू पडणारे पाठ, कविता आणि व्यावहारिक मराठी अशा तीन विभागात अभ्यासक्रमांची विभागणी केली आहे.

हया अभ्यासक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची गुणविभागणी सैद्धांतिक पाठ, अकादमीक उपक्रम, चर्चासत्र आणि मौखिकी परीक्षा हया प्रकारचा अंतर्भाव करून करण्यात आली आहे.

### अभ्यासक्रमांची प्रासंगिकता

हा मराठीचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना व्यावसायिक आणि व्यक्तिगत संधी उपलब्ध करून देणारा आहे. त्यासोबत वेगवेगळया स्पर्धा परीक्षेतही उपयोगी पडणारा आहे.

### 'मराठी' हा विषय आवश्यक मराठी म्हणून नेमला आहे

- मराठी ही भाषा विशेषत: महाराष्ट्रात तसेच महाराष्ट्राच्या आजू–बाजूला असणाऱ्या राज्यांमध्ये बोलली जाते. जसे गोवा, तेलंगना, मध्यप्रदेश, कर्नाटक तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरही मराठी भाषेचे लोक व्यवसायाच्या निमित्ताने वसले असून तेथेही मराठी भाषा बोलली जाते.

- पदवी अभ्यासक्रमाला नेमलेली आवश्यक मराठी भाषा विद्यार्थ्यांना वेगवेगळया नोकरीच्या आणि व्यवसायाच्या संधी राज्यस्तरावर व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देणारी आहे.
- मराठी भाषेच्या पदवीचे अध्यापन झाल्यानंतर तो विद्यार्थी शाळेत, कनिष्ठ महाविद्यालयात मराठीचा शिक्षक म्हणून आणि व्याख्याता म्हणून अध्यापन करू शकतो.
- त्याशिवाय मराठी विषय घेतलेल्या पदवीच्या विद्यार्थ्यांना अनुवादक म्हणून, निवेदक म्हणून, संपादक म्हणून, पत्रकार म्हणून, लेखक म्हणून संधी मिळू शकते.

**मराठी अभ्यासक्रमातून शिकविल्या जाणारी उद्दिष्टये**

- विद्यार्थ्यांची मराठी भाषेची आकलन क्षमता वृद्धीगत करण्यासाठी त्यांना साध्या – साध्या वाक्यातून प्रमाणभाषा शिकविली जाते.
- त्यांना संशोधन प्रकल्पांच्या माध्यमातून मराठी भाषेतील संशोधनपर पेपर लिहिण्याची कला अवगत केली जाते.
- विद्यार्थ्यांना वेगवेगळया तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जागतिक तसेच स्थानिय स्तरावरील मराठी भाषिकासोबत लिंक देऊन वेबिनारच्या माध्यमातून जोडण्याचा प्रयत्न केला जातो.
- आधुनिक भाषेत असलेले तंत्रज्ञान आणि ज्ञान त्यांच्या मराठी भाषेत कशाप्रकारे पोहचविता येतील यासाठी वेगवेगळे प्रयोग केले जाते.
- विद्यार्थ्यांच्या मनात मानवी मूल्य आणि जीवनमूल्य यांची रूजवात केली जाते.

## पाठयक्रमाचे विद्यार्थ्यांच्या जीवनात मिळणारे लाभ

- त्यांनी निवडलेल्या कार्यक्षेत्रात कार्यक्षमता वाढविणे.
- परिमाणात्मक कौशल्यासह कार्य करण्याची क्षमता वृद्धींगत करणे.
- अभिमुखतेसह कार्य करण्याची क्षमता निर्माण करणे.
- विद्यार्थ्यांचा मनात भाषेविषयी आणि संस्कृतीविषयी जिज्ञासा निर्माण करणे.
- संपादन केलेले ज्ञान आपल्या कार्यक्षेत्रात लागू करण्याची क्षमता निर्माण करणे.
- निरीक्षणात्मक आणि तपासात्मक कौशल्यक्षमता निर्माण करणे.
- व्यावसायिक मूल्ये आणि नीतीशास्त्र यांची सांगड घालणे.
- भाषिक संवाद संबंध निर्माण करणे.
- शब्द सामर्थ्याची क्षमता निर्माण करण्याची दृष्टी निर्माण करणे.
- मराठी भाषेमधील समकालीन शैली लक्षात घेऊन त्यानुसार लेखन करण्याची क्षमता निर्माण करणे.

मराठी विभाग प्रमुख
सेठ केसरीमल पोरवाल कला,
विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय,
कामठी, नागपूर

प्राचार्य
सेठ केसरीमल पोरवाल कला,
विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय,
कामठी, नागपूर